शुक्रवार, २९ मार्च २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २१५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 29 MARCH 2024 | adhunikkesari.com | • YEAR-03 • ISSUE-215 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-8 • PRICE-05

# अभिनेता गोविंदा एकनाथ शिंदे गटात

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले स्वागत



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : आपल्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवरणारा अभिनेता गोविंदाने गुरूवारी हाती भगवा झेंडा घेत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गोविंदाचे स्वागत केले. वर्षा बंगल्यावर अनेकांनी शिंदे गटात प्रवेश केला. त्याची सुरुवात गोविंदाच्या पक्ष प्रवेशाने झाली. मागील काही दिवसांपासून अभिनेता गोविंदा हा राजकारणात पुन्हा प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. राम नाईक यांचा पराभव करणारा गोविंदा आता शिंदेंच्या शिवसेनेत आला आहे.**

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शिवजयंतीच्या अत्यंत पवित्र दिनी आपले सगळ्यांचे लाडके आणि लोकप्रिय अभिनेते गोविंदा हे शिवसेनेत आले आहेत. मी त्यांचे मनापासून स्वागत करतो. डाऊन टू अर्थ असलेले आणि सगळ्यांना आवडणारे गोविंदा शिवसेनेत आले आहेत. सगळ्याच समाजात लोकप्रिय असलेले गोविंदा यांचे मी स्वागत करतो आणि त्यांचं अभिनंदन करतो. त्यांना शुभेच्छाही देतो. असं एकनाथ शिंदेंनी म्हटले आहे. मी आज या पक्षात आलो आहे. १४ वर्षांचा वनवास संपला आहे आणि रामराज्यात आलो आहे असे मला वाटते आहे. जी जबाबदारी मला दिली जाईल ती प्रामाणिकपणे पार पाडेन असे गोविंदाने म्हटले आहे. आजच्या दिवशी मी पक्षात प्रवेश करणे ही मला वाटते की देवाची कृपा आहे आणि प्रेरणा आहे. मी २००४ ते २००९ या कालावधीत राजकारणात होतो. त्यानंतर बाहेर पडलो. मला वाटले होते मी या बाजूला काही दिसणार नाही. पण २०१० ते २०२४ या १४ वर्षांच्या वनवासानंतर नवी सुरुवात करतो आहे. मी पुन्हा राजकारणात आलो आहे, शिवसेनेत आलो आहे. मागची दहा ते पंधरा वर्षे देवाचं स्मरण करुनच मी माझी कामं करत होतो. कारण मी सिनेमा क्षेत्र आणि राजकारण यापासून लांब जात होतो. मी एकनाथ शिंदे यांचे धन्यवाद देतो. जी जबाबदारी मला दिली जाईल ती मी पार पाडेन. कला आणि संस्कृती यासाठी जी सेवा करायची आहे ती मी करेन. विरारपासून मी बाहेर पडलो आणि जगात पोहचलो. मला कला आणि संस्कृतीसाठी काम करायला आवडेल. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. आपल्या देशात चित्रपट असो किंवा चित्रकूट असो ते कला आणि संस्कृतीचेच प्रतीक आहे. जयंत पाटील यांनी गोविंदाबाबत एक वक्तव्य केले की, चांगला कलाकार तरी घ्यायचा त्याबाबत विचारलं असता एकनाथ शिंदे म्हणाले जयंत पाटील यांच्यापेक्षा चांगले कलावंत आहेत गोविंदा. एका कलाकाराचा अपमान करणे म्हणजे संपूर्ण सिनेसृष्टीचा अपमान करणे आहे. याचे उत्तर त्यांना मिळेल असा टोला एकनाथ शिंदे यांनी लगावला आहे.

### चर्चेतील बातमी

## निवडणुकीचा पार्श्वभूमीवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** काल रात्रोच्या सुमारास नक्षली व पोलिस चकमक उडाली. या चकमकीत पोलिसांचा वाढता दबाव बघता नक्षली घटनस्थळावरून पसार झाले. पोलिसांनी घटनास्थळी झडती घेतली असता नक्षल्यांचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. गडचिरोली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कसनसूर चातगाव दलम आणि छत्तीसगडच्या औंधी दलमचे काही सशस्त्र कॅडर भुमकन गावाजवळ महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर कसनसूरच्या 15 किमी उत्तर पूर्वेस, जारवंडी पो.स्टे च्या 12 किमी दक्षिण पूर्वेस तळ ठोकून आहेत अशी गुप्त माहिती काल दुपारी मिळाली असता अपर पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या नेतृत्वाखाली ताबडतोब नक्षलविरोधी ऑपरेशन सुरु करण्यात आले. आठ सी-60, 1 क्यूएटी आणि सीआरपीएफ पथक परिसरात शोध घेत असतांना नक्षल्यांनी त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला. जवानांनीही प्रत्युत्तर देत गोळीबार केला. हि चकमक रात्रभर सुरुच होती होती. दरम्यान नक्षल्यांनी BGL ने गोळीबार केला त्याला जवानांनाही जोरदार प्रत्युत्तर दिले. पोलिसांचा वाढता दबाव बघता अंधाराचा फायदा घेत नक्षली पळून गेले. सकाळी घटनास्थळी झडती घेतली असता मोठ्या प्रमाणात नक्षल्यांचे सामान, साहित्य, वायर्स, जिलेटिनच्या काठ्या, बॅटऱ्या, सोलर पॅनल इत्यादी जप्त करण्यात आले. परिसरात अद्यापही नक्षलविरोधी अभियान सुरुच आहे.

# प्रणिती शिंदेंचे राम सातपुतेंना जशास तसे उत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** लोकसभा मतदारसंघात भाजपाचे आमदार राम सातपुते आणि काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांच्यात लढत होणार आहे. दोन्ही उमेदवारांनी प्रचाराला सुरूवात केली असून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात येत आहेत. आमदार सातपुते यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना त्यांच्या मालमत्तेचा हिशेब देण्याचे आव्हान दिले होते. राम सातपुते यांनी दिलेल्या आव्हानानंतर आता प्रणिती शिंदे यांनी त्यांना सोलापूरच्या प्रचार सभेत जशास तसे उत्तर दिले आहे. माझ्या वडिलांना काय बोलता? भिडायचे असेल तर माझ्याशी भिडा, मी निवडणुकीला उभी आहे, असे त्या म्हणाल्या आहेत.

सुशीलकुमार शिंदे साहेब लोकांसाठी रात्रंदिवस काम करत आहेत, आणि तुम्ही त्यांना हिशेब विचारता? यावरून तुमचे संस्कार कळतात. ज्यांना संस्कार दिले गेले नाहीत ते सर्व एकत्र आले आहेत. माझ्या विरोधात जे उभे आहे, त्यांना तुम्ही (लोक) पार्सल म्हणता. मात्र, मी काही म्हणणार नाही. आत ते काही दिवसांपासून सुशीलकुमार शिंदे यांच्यावर बोलत आहेत.

आरे भिडायचे असेल तर माझ्याशी भिडा, मी निवडणुकीला उमेदवार म्हणून उभी आहे. माझ्या वडिलांना का बोलता? ज्या माणसाने आयुष्यभर संघर्ष केला. सुशीलकुमार शिंदे यांचा संघर्ष संपूर्ण सोलापुरकरांना माहिती आहे. तरीही असे बोलायला लाज वाटायला पाहिजे. ते जरी बोलले तरी मी त्यांच्या वडिलांवर कधी बोलणार नाही. कारण आपण सुसंस्कृत लोक आहोत. त्यांना जर बोलायचे असेल तर माझ्या कामाबद्दल बोला. गेले १५ वर्ष लोक मला निवडून देत आहेत. तरीही तुम्ही म्हणता की संघर्ष केला नाही. हा माझा नाही, लोकांचा अपमान आहे, अशी टीका प्रणिती शिंदे यांनी राम सातपुते यांच्यावर केली. माझे आई-वडील ऊसतोड कामगार होते. आम्ही साध्या झोपडीत राहायचो. माझे शिक्षण बी. टेकपर्यंत झाले. पत्नीही बी. टेक असून तिची आयटी कंपनी आहे. बँकेचे कर्ज काढून बंगला बांधला आहे. त्याचा संपूर्ण हिशेब मी द्यायला तयार आहे. मात्र, वर्षानुवर्षे सत्तेत राहिलेले सुशीलकुमार शिंदे यांनीही त्यांनी कमावलेल्या मालमत्तेचा हिशेब द्यावा, असे राम सातपुते यांनी म्हटले होते.

# शेवटच्या दिवशी 29 उमेदवारांचे 37 नामनिर्देशन पत्र दाखल

## चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाकरीता 36 उमेदवारांचे एकूण 48 अर्ज

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा मतदार संघाकरिता नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी बुधवारी (27 मार्च) 29 उमेदवारांनी 37 नामनिर्देशनपत्र दाखल केले. त्यामुळे चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात अर्ज भरणा-या एकूण उमेदवारांची संख्या 36 तर दाखल नामनिर्देशनपत्रांची एकूण संख्या 48 झाली आहे. बुधवारी (दि.27 मार्च) अर्ज दाखल करणा-यांमध्ये धानोरकर प्रतिभा सुरेश (काँग्रेस) यांनी 3 अर्ज, बेले राजेश वारलुजी (वंचित बहुजन आघाडी) यांनी 3 अर्ज, विद्यासागर कालिदास कासर्लावार यांनी 1 अर्ज भीमसेना पक्षाच्यावतीने तर 1 अर्ज अपक्ष म्हणून, नामदेव माणिकराव शेडमाके (गोंडवाना गणतंत्र पार्टी) यांनी 2 अर्ज, जावेद अब्दूल कुरेशी यांनी 1 अर्ज अपनी प्रजा हित पार्टीच्या वतीने तर 1 अर्ज अपक्ष म्हणून, रमेश आनंदराव मडावी यांनी 1 अर्ज बहुजन समाज पार्टीच्यावतीने तर 1 अर्ज अपक्ष म्हणून दाखल केला आहे.



याशिवाय पुर्णिमा दिलीप घनमोडे (बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी), दिवाकर गुलाब पेंदाम (विरोंके वीर इंडियन पार्टी), मोरेश्वर कोंदुजी बडोले (अपक्ष), मिलिंद प्रल्हाद दहिवले (अपक्ष), सेवकदास कवडूजी बरके (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया, डेमोक्रेटीक), अमोल ओमप्रकाश कोमावार (हिंदू राष्ट्र संघ), राजेंद्र हरिश्चंद्र रामटेके (बहुजन समाज पक्ष), राजेंद्र कृष्णराव हजारे (अपक्ष), दिनेश रामबिशाल मिश्रा (अपक्ष), वनिता राजेंद्र राऊत (अखील भारतीय मानवता पक्ष), जावेद मजिद अब्दुल (अपक्ष), विकास उत्तमराव लसंते (सन्मान राजकीय पक्ष), वाघमारे संदीप विठ्ठल (अपक्ष), देठे प्रमोद देवराव (अपक्ष), संजय नीलकंठ गावंडे (अपक्ष), संजय हरी टेकाम (अपक्ष), राजेश भीमराव घुटके (अपक्ष), शेख ताजुद्दीन वजीर (अपक्ष), सुर्या मोतीराम अडबाले (अपक्ष), अनिल आनंदराव डहाके (अपक्ष), दिवाकर हरीजी उराडे (आंबेडकराईट पार्टी ऑफ इंडिया), दिलीप पुंडलीकराव माकोडे (अपक्ष), गीता अरुण मेहर (अखील भारतीय परिवार पार्टी) यांनी प्रत्येकी 1 अर्ज दाखल केला.


13 चंद्रपूर लोकसभा मतदार संघात मंगळवारी (26 मार्च) 7 उमेदवारांनी 11 अर्ज दाखल केले होते.

# भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंकडून आदर्श आचारसंहितेचा भंग

## अतुल लोंढे : नवनीत राणांचे जात प्रमाणपत्र प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ठ

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आदर्श आचारसंहितेचा भंग केला असून निवडणुक आयोगाने त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांच्या जात प्रमाणपत्राचे प्रकरण सुप्रीम कोर्टात अद्याप प्रलंबित आहे, त्याचा निकाल लागलेला नाही असे असताना बावनकुळे यांनी निकाल लागला असल्याचा दावा करुन मा. न्यायालयाचा अवमान केला आहे, हा गंभीर गुन्हा असून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे. यासंदर्भात काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका-यांकडे लेखी तक्रार केली असून या तक्रारीत असे म्हटले आहे की, २८ मार्च २०२४ रोजी खासदार नवनीत राणा यांच्या भारतीय जनता पक्षातील प्रवेशावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी, सुप्रीम कोर्टाने खासदार नवनीन राणा प्रकरणी निर्णय दिलेला आहे, अशा प्रकारचा चुकीचा व दिशाभूल करणारा खोटा दावा केला आहे. अशा पद्धतीचे विधान जाणीवपूर्वक करुन खोटी माहिती पसरवली जात आहे, हा प्रकार मतदारांवर प्रभाव टाकण्यारा आहे तसेच आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन असून भारतीय दंड संहिते अंतर्गत गुन्हा आहे, असेही अतुल लोंढे म्हणाले. नवनीत राणा या अमरावती लोकसभा मतदारसंघातून २०१९ च्या निवडणुकीत विजयी झाल्या, अमरावतीची जागा अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव आहे. या मतदारसंघातून विजयी झालेल्या नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र मा. मुंबई हायकोर्टाने २०२१ मध्ये रद्द ठरवत दोन लाखांचा दंडही ठोठावला आहे. त्यानंतर नवनीत राणा यांनी हायकोर्टाच्या निर्णयाला मा. सुप्रीम कोर्टात आव्हान दिले होते. २८ फेब्रुवारी २०२४ च्या सुनावणीनंतर मा. सुप्रीम कोर्टाने निकाल राखून ठेवलेला आहे, असे असतानाही चंद्रशेखर बावनकुळे यांनी निकाल लागलेला आहे, असे खोटे सांगून जनतेची दिशाभूल केली आहे, असा आरोप अतुल लोंढे यांनी केला आहे.




# उगवतीचे रंग


विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

' बोले तैसा चाले..' ही उक्ती सार्थ ठरवणारे थोर संत म्हणजे जगद्गुरू संत तुकाराम महाराज. ज्या भागवत धर्माचा पाया संत ज्ञानेश्वरांनी रचला, त्या भागवत धर्माचा कळस होण्याचे भाग्य तुकोबांना लाभले. अर्थातच ते त्यांच्या कर्तृत्वाने.त्यांच्या काळात ही भागवत धर्माची पताका उंच आकाशी जाऊन डौलाने फडकू लागली. फाल्गुन वद्य द्वितीया. हाच तो दिवस, की ज्या दिवशी तुकाराम महाराज सदेह वैकुंठाला गेले असे म्हटले जाते. हा दिवस ' तुकाराम बीज ' म्हणून ओळखला जातो. दुपारी १२.०२ मी. त्यांनी वैकुंठाकडे प्रयाण केले. त्या वेळी तेथे असलेला नांदुरकी वृक्ष थरारला. आजही हा वृक्ष तुकाराम बीजेच्या दिवशी दुपारी बरोबर त्याच वेळेला थरारतो ही श्रद्धाळुंची भावना आहे. हा चमत्कार पाहण्यासासाठी आजही हजारो लोक तेथे गर्दी करतात. ' जशी श्रद्धा, तसा अनुभव ' प्रत्येकाला येतो. अणुरेणिया थोकडा..' असलेला तुका आकाशाएवढा झाला तो त्याच्या प्रचंड कार्याने. आणि खरोखरच आकाशाएवढी उंची असलेला हा संत सर्वसामान्यांसाठी खाली आला. खाली आला म्हणजे त्यांनी सर्वसामान्य माणसाला त्याला समजेल अशा भाषेत वेदांत सांगितला. आणि रोखठोकपणे सांगून टाकले ' वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा , येरांनी वाहावा भार माथा. '

तुकोबा हे मला शाळेतल्या निष्णात शिक्षकासारखे वाटतात. शाळेत शिकवणाऱ्या सर्वच शिक्षकांजवळ मुलांना समजेल अशा पद्धतीने शिकवण्याची हातोटी असतेच नाही. असे मोजकेच शिक्षक असतात. जे त्यांच्या शिकवण्याच्या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या कायम लक्षात राहतात. तुकोबा असे समाजशिक्षक होते. नाठाळ विद्यार्थ्यांना कसे वठणीवर आणायचे ते कुशल शिक्षकाला उत्तम कळते. म्हणूनच ज्यांना सहज सांगून समजणार नाही अशा नाठाळांच्या माथी काठी हाणण्याचे धारिष्ट्य ते दाखवतात. या अर्थाने तुकोबाराय समाजशिक्षक आहेत. जो खरा शिक्षक असतो, तो आपल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रबोधन घडवून आणतो. त्यांना अधर्म, अनाचार, अंधश्रद्धा यांना बळी पडू नका असे समजावून सांगतो. त्याने दिलेल्या ज्ञानाच्या प्रकाशात मग ही अज्ञानाची, अंधश्रद्धेची जळमटं नाहीशी होतात. तुकोबांनी हेच काम केले. त्या काळात समाज आपले स्वत्व हरवून बसला होता. परकीय सत्तांनी महाराष्ट्र आणि भारत व्यापला होता.



# आनंदी पहाट

## जीवनशैलीतील बदलाची आवश्यकता

आधुनिक केसरी

आपल्या कामाची रचना आणि दिनचर्या नसणे हे जीवनात प्रेरणा नसण्याचे एक सामान्य कारण असते. कामाच्या रचना आणि आपल्या दिनचर्या सवयींना घट्ट करण्यास मदत करतात. काहीतरी करण्याची प्रेरणा वाटण्याऐवजी कृती करणे अधिक महत्वाचे असते. डिस्टिमिया हा नैराश्याचा सौम्य परंतू दीर्घकाळ टिकणारा प्रकार आहे. याला पर्सिस्टंट डिप्रेशन डिसऑर्डर असेही म्हणतात. उदासीनतेच्या अधिक तीव्र, क्रॉनिक किंवा आवर्ती भागांनंतर असे बदल घडतात की नाही हे निर्धारित करण्यासाठी भविष्यातील अभ्यास करणे आवश्यक असते. नैराश्य टाळण्यासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी नियमित व्यायाम करावा, सामाजमाध्यामांच्या वापराचा वेळ कमी करावा, थेट मजबूत सामाजिक संबंध तयार करावेत, आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करावा, शारीरिक ताण आणि मानसिक तणाव कमी करावा, भरपूर झोप घ्यावी, नकारात्मक विचार, वर्तन असणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहावे, आळसावर मात करावी, आपले ध्येय व्यवस्थापित करण्यायोग्य बनवावे. अवास्तव उद्दिष्टे विचारात घेणे टाळावे, स्वतःला १०० टक्के परिपूर्ण असण्याची अपेक्षा करू नये, नकारात्मक बोलण्याऐवजी सकारात्मकतेचा वापर करावा, प्रत्येक कामाची कृती योजना तयार करावी, शक्य तितकीच ताकद वापरावी, त्यासाठी आपले कर्तृत्व ओळखावे, मदतीसाठी आप्तेष्टांचा विचार करावा, अंतर्मन विचलित होणे टाळावे. नैराश्याची चार प्रमुख कारणे असतात, ती म्हणजे कौटुंबिक इतिहास, आजार आणि आरोग्य समस्या, औषधे तसेच अल्कोहोल आणि आपले व्यक्तिमत्व होत. शरीरांतर्गत जनुके, मेंदूतील रसायने आणि सभोवतालचे वातावरण यासह अनेक गोष्टी उदासीनता येण्यास कारणीभूत ठरत असतात. अनेकांच्या जीवनातील मोठ्या बदलानंतर किंवाआघातानंतर नैराश्य येण्याची शक्यता असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी


## उभे विटेवरी | शब्दब्रह्म ||

शब्द माझा सखा | शब्द पंचप्राण ||
व्हावा संजीवन | शब्द नाद ||१||
मायाळू पाझर | लडीवाळ पान्हा ||
शब्द व्हावा तान्हा | ज्ञानाईचा ||२||
रूजावा श्वासात | अंकुर शब्दांचा ||
दास अभंगाचा | व्हावा जीव ||३||
शब्दांच्या नदीचा | प्रवाह सोज्वळ ||
वाहो गंगा जळ | निरंतर ||४||
शब्द पंढरीचा | व्हावा वारकरी ||
उभे विटेवरी | शब्दब्रह्म ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# हितगुज



पुष्प २८वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## स्वामी अस्तित्वाची अनुभती : गुरुपीठ


स्वामी महाराज म्हणाले होते - 'डोंगर बोलतील, तेव्हा मी उठेन' डोंगरांना बोलते करणारी माणुसकी, कारुण्य, परमप्रेम सेवेकर्यांच्या हृदयात वसले की सर्वत्र सर्व वेळ श्री स्वामी महाराजांच्या अस्तित्त्वाचा कृपामय अनुभव येईल. त्यासाठीची साधना अखंडपणे या गुरुपीठात सुरू आहे. परब्रह्म श्री स्वामी समर्थ महाराजांच्या नित्य अस्तित्त्वाची अनुभूती देणारे हे चैतन्यधाम आहे. परम आनंदाचे वसतीस्थान असलेले श्री गुरुपीठ अपूर्व मनःशांतीचा प्रत्यय, विवेकाचे बळ व निर्धाराची शक्ती देणारे आहे. रेलचेल नसून प्राचीन काळच्या समाजाचे जगणे सरस, सप्राय, स्नेहपूर्ण होते. त्यातूनच सुंदर कला व चेतन संस्कृती निर्माण झाली. 'देवी सप्तशती'नुसार महासरस्वती चंडमुंड विनाशिनी दुर्गा आहे. पौराणिक संदर्भानुसार देवी सरस्वती 'वीणापुस्तक रंजित हस्ते', 'श्वेतवर्णा', 'तुषारहार धवला', 'श्वेत आभरणा', 'श्वेत पद्मासना', 'कुर्वेन्दुसम', 'श्वेतहंसवाहिनी' आहे. हे रूप युगानुयुगे जनमानसात रुजले, रूढ झाले आहे. ज्ञानाचे अत्यंत पवित्र, शुभ्र, महाउज्ज्वल लावण्य म्हणजे समस्त दृष्टी, पंचामृतात स्नान करून गंगाजलाने स्वच्छ व्हावी, असा बोध होय. ज्ञानाने प्राप्त दृष्टी 'स्व'च्या पलिकडे सर्वांच्या कल्याणाचा वेध घेत सर्वात्मक आपुलकीने जीवनाशी एकरूप होते, तेव्हा दृष्टीला, वाणीला, कृतीला सरस्वतीचे वरदान प्राप्त होऊन 'परब्रह्म पाहिले मी डोळां' असा आनंद-सोहळा सुरू होतो. विद्येचे लेणे अशा भावनेने ल्यायचे, हीच ज्ञानसाधना होय. अशा संशय रहित विद्या साधनेसाठी परब्रह्म श्री स्वामी समर्थ महाराजांची कृपा आवश्यक आहे. 'ज्यांच्या वरप्रसादें करून। मूढां होय शास्त्रज्ञान। त्या समर्थांचे चरण। वारंवार नमितसे।'

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

इन्द्रिय उपरम हो गई, संस्कार रह ताहि ।
जन्म अनेक न आवई, छाया दृश्य समाहिं
।।२९।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/२९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जेव्हा इंद्रिये त्यांच्या कार्यांपासून विलग (उपरम) होतात आणि मन कंठात स्थिरावते, त्यावेळी अनेक जन्मांचे संस्कार मनात येतात आणि त्या छाया-दृश्यांना मन पहाते. स्वप्नात अनागत (अज्ञात) विषयांचेही ज्ञान होत असते. चांगल्या वाईट संस्कारांच्या प्रभावामुळे मनाला सुख-दुःख होते. हे स्वप्न अवस्थेचे लक्षण आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज


संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# कारणावाचून आनंद, तो खरा.

आधुनिक केसरी

जगण्यामध्ये काहीतरी आनंद असला पाहिजे. जगणे हे आनंददायक आहे, मग आपल्याला दुःख का होते ? म्हणजे, मनुष्य आनंदासाठी जगतो आणि दुःख करतो. याचे कारण असे की, आपण कशाकरिता काय करतो हेच विसरतो. मनुष्य आनंदासाठी न जगता वस्तूसाठी जगतो. वस्तू ही सत्य नसल्यामुळे तिचे रूप अशाश्वत असते. अर्थात् तिच्यापासून मिळणारा आनंद हा देखील अशाश्वत असतो.

मी आनंदात राहावे असे प्रत्येकाला वाटते; म्हणजेच भगवंताकडे जावे असे वाटते, कारण भगवंत आनंदस्वरूप आहे. आपल्याला अशी एक सवय लागली आहे की, काहीतरी कारणाशिवाय आपण आनंद भोगूच शकत नाही. प्रत्यक्ष कारण सापडत नसेल तर आपण आपल्या कल्पनेचे राज्य उत्पन्न करतो, आणि त्यापासून आनंद भोगतो. आनंद मिळविण्यासाठीच प्रत्येक मनुष्याची खटपट आहे; पण कारणावर अवलंबून असणाऱ्या आनंदाची वाट दुःखामधून आहे, आणि त्या आनंदासाठी मनुष्य दुःखदायक प्रपंचाची



कास धरतो. म्हणून, कोणतेही कारण नसलेला आनंद भोगण्याची आपण सवय लावून घ्यावी. कारणावर अवलंबून असणारा आनंद हा अशाश्वत असणार, म्हणून तो खरा आनंद नाही. कारणाशिवाय आनंद मिळविण्यासाठी अगदी स्वस्थ बसायला शिकावे. हे ' काहीही न करणे ' ही फारच उच्च अवस्था आहे. काही तरी करण्यापेक्षा ती फारच कठीण आहे. भगवंताशी अगदी अनन्य होणे, आपले कर्तेपण पूर्ण मारणे, ही ती अवस्था आहे. आनंद पाहिजे असेल तर तुम्ही आनंदातच राहा ! कशाही परिस्थितीत आनंद राहावा. आपल्या मनासारखी गोष्ट घडून आली तर समाधान वाटावे. कुणीही मनुष्य स्वतःसाठीच सर्व करतो. समजा, आपल्याला त्रास देणारा कुणी आहे; आपल्याला त्रास दिला तर त्याला बरे वाटते; म्हणजे आपल्याला दुःख दिले तर त्याला आनंद होतो, म्हणून तो नुसता स्वतःसाठीच माझ्याशी तसा वागतो; हे जसे खरे, तसेच, त्याने दिलेला त्रास मी का घ्यावा ? त्याने काहीही केले तरी आपला आनंद का बिघडू द्यावा ? असे आपण वागावे. काल जे झाले त्याबद्दल दुःख करू नये, उद्या काय होणार याची काळजी करू नये, आज मात्र आनंदात आपले कर्तव्य करावे आणि भगवंताच्या अनुसंधानात राहावे. यातच सर्व आले.

२३९. भगवंताची प्राप्ती व्हावी असे वाटणे हे जन्माचे सार्थक आहे.

## मायाब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

पूर्ण निराकार आणि स्वतंत्र परमात्मवस्तूला अनंत आकार देणारी आणि द्रुश्याच्या कक्षेत येणारी अशी शक्ति प्रथम आत्मस्वरूपावर लक्ष देत नाही. ती ते आत्मस्वरूप बाजूला ठेवते. त्या शक्तिचे नाव माया आणि झाकणाचे नाव आहे अज्ञात किंवा अविद्या होय. अज्ञान, भ्रम, अध्यास,देहबुद्धी ही सगळी मायेची च प्रजा आहे. आत्मज्ञानी पुरूषाला परमात्म वस्तु जशी आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २९ मार्च २०२४
adhunikkesari.com

# आरोपींना लवकरात लवकर अटक : पो.नि. संदीप कोळी

## महसूल कर्मचाऱ्यांचे आंदोलन तूर्तास स्थगित...

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** येथील तहसीलदार यांच्यासह महसूल पथकाला वाळू माफियांकडून शिवीगाळ, दमदाटी करून धमकी दिली व शासकीय कामात अडथळा आणल्याची घटना शनिवारी (दि.२३) घडली. या घटनेच्या निषेधार्थ येथील तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि. २६) सकाळी १० वाजेपासून कामबंद आंदोलन सुरू केले होते. त्यामुळे तहसील कार्यालयातील सर्व कामे ठप्प पडली होती.

या संदर्भात तहसील कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्रित येवून अप्पर जिल्हाधिकारी शिर्डी यांना निवेदनाद्वारे सदरच्या गुन्ह्यातील आरोपींना तात्काळ अटक व्हावी, तसेच किमान एक शस्त्रधारी पोलीस कर्मचारी पथकासोबत नियुक्त करावा. पथकाला जिल्हाधिकारी यांच्या कडील वरील नमूद परिपत्रकाप्रमाणे सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी कोपरगाव तहसील कार्यालयाच्या महसूल विभाग कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली होती. गेल्या काही दिवसांपासून वाळू माफियांचा धुमाकूळ सुरू आहे.



दरम्यान दि २६ मार्च रोजी उशिरा ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यात येईल, असे आश्वासन दिल्यामुळे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले असल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार प्रफुल्लीता सातपुते यांनी दिली.

दरम्यान कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली व आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यात येईल असे आश्वासन देऊन कायमस्वरूपी एक शस्त्रधारी कर्मचारी पथकासोबत देण्याची मागणी मान्य केली. यावेळी तहसीलदार संदीप कुमार भोसले हेही उपस्थित होते.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी चोरटी वाळू वाहतूक नियंत्रणाचे काम करताना आम्हालाही पोलीस स्टेशनकडून सहकार्याची अपेक्षा आहे ती मिळावी आणि दमबाजी व शिवीगाळ झाली त्यावेळेला अजूनही मोठा जमाव तहसील कार्यालयाचे आवारात उपस्थित होता ते सीसीटीव्ही फुटेज आपण मागवून घेऊन त्यातील दोषींवर देखील गुन्हे दाखल करावेत अशी प्रभावी मागणी करण्यात आली.

त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी तूर्तास आपले आंदोलन स्थगित केले आहे. यावर पोलीस प्रशासन नेमके काय कारवाई करते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

वाळूचा उपसा बंद केल्यानंतर नगर जिल्ह्यामध्ये अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत. एकीकडे वाळू मिळत नसल्यामुळे तसेच वाळू उपशाला पायबंद घातल्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ले करण्याचे प्रकार जिल्ह्यामध्ये या अगोदरही घडलेले आहेत. त्यामुळे वाळू माफियांना कोणाचे अभय आहे. त्यांचे धाडस कसे वाढले, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

# चिचोंडी पाटील येथे तिथीप्रमाणे शिवजयंती उत्साहात साजरी



आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** चिंचोडी पाटील येथे तिथीप्रमाणे शिवसेना शाखेच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी नगर तालुका पंचायत समिती सभापती इंजि.प्रविणदादा कोकाटे,सरपंच शरदभाऊ पवार,चेअरमन महादेव खडके, शिवसेना नेते डॉ.मारुती ससे, उपसरपंच महादजी कोकाटे,मा.उपसभापती दत्तात्रय हजारे,मा.सरपंच मच्छिंद्र खडके,व्हा. चेअरमन सुरेश ठोंबरे,मा.चेअरमन श्रीरंग कोकाटे,मा.उपसरपंच भाऊसाहेब ठोंबरे,मा.चेअरमन पांडुरंग ससे,मा. उपसरपंच महेश जगताप पा.,मा.व्हा. चेअरमन काशिनाथ बेल्हेकर,प्रभाकर हजारे, रामदास कोकाटे, ग्रा.पं.सदस्य विश्वसागर कोकाटे, प्रशांत कांबळे, माऊली ठोंबरे, वैभव कोकाटे,संदीप काळे, सोसायटी संचालक पंडितराव कोकाटे, अजय कांकरिया, शाखाप्रमुख दत्ता जाधव, महादेव खडके,भाऊसाहेब वाडेकर, अर्जुन वाडेकर,आदिनाथ हजारे, रमेश कुलथे, बाबासाहेब परकाळे, कल्याण जगताप पा.,संतोष वाडेकर, सुखदेव कोकाटे, रघुनाथ कोकाटे,गोरख वाडेकर, शहाजी गोरे, बबन कोकाटे,महादेव कोकाटे सर, शेळके सर,पोपट कोकाटे,योगेश पवार, अक्षय कांकरिया, भाऊ गायवळ, खुशाल पवार, चंद्रकांत पवने, दिपक कांबळे,अतुल पाटील, शेषराव ठोंबरे,अजय हजारे, संजय कोकाटे, महादेव गायवळ, अशोक खराडे, शिवाजी बेल्हेकर, बाळासाहेब बेल्हेकर, अनिल सुरवसे, प्रशांत कोकाटे, दिपक मेटे, रघुनाथ दळवी, पवार सर,करांडे गुरुजी, प्रशांत कोकाटे, अनिकेत जगताप, नेवासराव कोकाटे, दिनेश वाडेकर, जाणू तनपुरे, निवृत्ती कोकाटे, शंकर काळदाते, विलास देवकर, छबुराव कोकाटे, संपत धलपे, राजेंद्र कोकाटे, गणेश वाडेकर, नानासाहेब कोकाटे, अमोल काकडे आदिंसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवरायांचे विचार घेऊन जीवन जगणे गरजेचे आहे असे प्रतिपादन सभापती इंजि. प्रविणदादा कोकाटे यांनी केले व उपस्थित नागरिकांचे आभार मानले. सरपंच शरदभाऊ पवार यांनी सर्व उपस्थित शिवप्रेमींना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

# आदर्श विद्यामंदीरचे वार्षिक बक्षीस वितरण समारंभ थाटात

आधुनिक केसरी न्यूज


**सोनई :** श्री हनुमान सामीण विकास व संशोधन मंडळ पानसवाडी संचलित आदर्श विद्यालयचा 'वार्षिक पारितोषक वितरण समारंभ सोहळा" शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या शुभप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी रविराज तुकारामजी पा. गडाख हे होते. प्रमुख पाहुणे संचालिका मा. श्रीमती लक्ष्मीबाई तुकारामजी पा. गडाख उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थिती प्रतिक ज्ञानेश्वर फोपसे (सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर) व अनिल दरंदले (मुख्याध्यापक आदर्श विद्या मंदीर प्राथ), शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अरूण चांदघोडे उपस्थित होते, वार्षिक बक्षिस वितरण समारंभ सोहळ्याची सुरुवात दिप प्रज्वलाने व महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून झाली.



व्यासपिठावर उपस्थित मान्यवरांच्या आदर्श विद्या मंदिर सोनई च्या वतीने शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. श्रीमती लक्ष्मीबाई तुकारामजी चा. गडाख यांच्या शुभहस्ते विदयार्थ्यांना पारितोषक वितरण करण्यात आले. मुख्य उपस्थिती असलेले आदर्श विद्या मंदिर सोनई शाळेचा माजी विद्यार्थी श्री. प्रतिक ज्ञानेश्वर फोपसे यांनी कठोर मेहनत, चिकाटी, जिदद यांचा योग्य समन्वय साधून MPSC परिक्षेच्या माध्यमातून SALES TAX INSPECTOR (STI) अधिकारी होऊन यशाला गवसनी घालून आपल्या आईवडीलांच्या स्वप्न पूर्ण केले व शाळेचे नावलौकिक केले.

आदर्शाची प्रेरणा घेऊन यशाची शिखरे सर करा. आपली ध्येये मोठी ठेवा व ती ध्येये साध्य करण्यासाठी अथक परिश्रम परिश्रम करा असे विचार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री प्रतिक ज्ञानेश्वर फोपसे यांनी आपल्या मनोगतातून विदयार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शनातून सांगितले. संस्थेचे सचिव मा. श्री. रविराज तुकारामजी पा. गडाख व शाळेचे मुख्याध्यापक श्रीखेसमाळसकर यांच्या संकल्पनेत विदयाध्यामध्ये नैसर्गिक उपजत सुप्त गुणांना प्रेरणा देवून त्या गुणांचा विकास व्हावा यासाठी वर्षभरापासून आदर्श विद्या मंदीर सोनई येथे विविध नवोपक्रम राबविण्यात आले. सदर वार्षिक लेखाजोख । (अहवाल) मुख्याध्यापक सरांनी सर्वासमोर वाचून दाखवला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री दराडे सर व प्रास्ताविक श्रीमती निसर्गध मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. पवार एस पी सर यांनी केले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## भागवतांचा इशारा

आधुनिक केसरी

राष्ट्रीय स्वयंसवेक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी राज्यकारभार करणाऱ्या राजाचे वर्तन कसे असावे, यावर महत्त्वाचे विधान केले आहे. मुंबईच्या विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघाच्या १०१ व्या वर्धापनदिनानिमित्ताने केले. 'सामाजिक परिवर्तन – संस्थांची भूमिका' या विषयावर सरसंघचालक भागवत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी मोहन भागवत यांनी विविध विषयांवर भाष्य करताना नागरिकांनी आणि राज्यकारभार करणाऱ्या राज्यकर्त्यांनी कोणती मूल्य जपली पाहीजेत, यावर विवेचन केले. पैशांची उधळपट्टी न करता समाजात साधेपणाने आणि काटकसरीने रहावे, स्वदेशीची कास धरुन गरजूंना आर्थिक मदत करावी. घरात दोन मोटारगाड्या, महागडा स्मार्ट रंगीत दूरचित्रवाणी संच आदी चैनीच्या वस्तूंची खरोखर गरज आहे का? याचाही प्रत्येक सुजाण नागरिकाने विचार करावा. नागरिकांनी नियमांचे पालन करुन पर्यावरणाचे रक्षण करावे. सुजाण, शिस्तप्रिय व देशभक्त नागरिक आणि समाज असेल, तर तो देश मोठा होतो. याद्दष्टीने सामाजिक संस्थांनी नागरिकांमध्ये ही जाणीव व प्रेरणा निर्माण करण्यासाठी मनपरिवर्तनाची जबाबदारी पार पाडावी", असे आवाहन मोहन भागतव यांनी व्याख्यानादरम्यान बोलताना केले.राजा हा समाजामुळे असतो आणि नीट राज्यकारभार केला नाही, तर त्याला पायउतारही व्हावे लागते", अशी अनेक उदाहरणे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशाचे उत्थान आणि पतन हे समाजाच्या उत्थान व पतनावर अवलंबून असते. समाजपरिवर्तनात सामाजिक संस्थांसह सर्वांचीच जबाबदारी महत्त्वाची असते", असे सांगून भागवत यांनी प्रगत देशांमधील नागरिकांचे वर्तन, विचार आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील काही घटनांचा उल्लेख केला.

## भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन शक्य आहे का ?



जगन घाणेकर
मो. ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने वर्ष २०२३ मध्ये एकूण ८१२ धाडी घालून १ हजार १८१ लाचखोरांना अटक केली; मात्र यांतील केवळ ९३ जणांवर दोषारोप प्रविष्ट करण्यात आले असून त्यापैकी २१ प्रकरणांतील आरोप सिद्ध होऊन आजतागायत केवळ २८ जणांवर कारवाई झाली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या तुलनेत शिक्षा होण्याचे प्रमाण केवळ १.७७ टक्के आहे, तर गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाणही केवळ ३.४४ टक्के आहे.**

भ्रष्टाचाराच्या विरोधातील कारवाईतील दोष सिद्ध होण्याची ही स्थिती अत्यंत विदारक असून ही टक्केवारी अशीच कायम राहिली तर देशातून भ्रष्टाचाराचे उच्चाटन कधीतरी होऊ शकेल का ?आजमितीला भ्रष्टाचार ही एक फार मोठी समस्या बनली आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्वच ठिकाणी भ्रष्टाचाराशिवाय पान हलत नाही. माननीय पंतप्रधानांनी भ्रष्टाचाराविरोधात आसूड उगारला असला, तरी सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार आज एव्हढा मुरला आहे कि त्याचे निर्मूलन करणे सरकारपुढील मोठे आव्हान असणार आहे. विकासासाठी आणि जनतेच्या सोयीसुविधांसाठी शासनाकडून विविध योजना आखल्या जातात. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला जातो; मात्र राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचारामुळे या शासकीय योजना आणि निधी तळागाळापर्यंत येईपर्यंत त्यातील बराचसा मलिदा राजकीय मंडळींकडून लाटला जातो. माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी देशातील भ्रष्टाचारावर भाष्य करताना म्हटले होते 'सामान्य लोकांच्या योजनांसाठी दिल्लीतून निघालेल्या १०० रुपयांपैकी सामान्य लोकांपर्यंत केवळ १० रुपयेच पोहोचतात.' शासकीय कार्यालये भ्रष्टाचाराची कुरणे आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. शहरांसारख्या प्रगतशील भागांत शासकीय अखत्यारीतील काही क्षेत्रांत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि डिजिटलायझेशन यांमुळे सामान्य जनतेचा सरकारी अधिकाऱ्यांशी थेट संपर्क येत नसल्यामुळे भ्रष्टाचारावर काही अंशी अंकुश आला असला, तरी ग्रामीण भागातील अशिक्षित जनतेची भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून लहान सहान कामांत सर्रासपणे लुबाडणूक सुरु आहे. कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून कररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही सरकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात. शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही. सरळमार्गाने काम करून घायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या मागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते. सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. आजमितीला राज्याचा महसूल विभाग आणि पोलीस विभाग भ्रष्टाचारात अग्रणी असला, तरी आज कोणतेही क्षेत्र भ्रष्टाचारमुक्त राहिलेले नाही. चांगल्या शाळेत, महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल, तर लक्षावधी रुपयांचा निधी शाळेला द्यावा लागतो, हाही एक भ्रष्टाचारच आहे. सर्दी पडशासारख्या सामान्य आजारांत वेगवेगळ्या चाचण्या करायला लावून त्यातून कमिशन लाटणे, औषधाने बरे होणाऱ्या आजारासाठी रुग्णांना महागडी शस्त्रक्रिया करण्यास भाग पडणे, महागडी औषधे आणि तीही औषधांच्या ठराविक दुकानांतून घेण्यास लावणे, कट प्रॅक्टिस यांसाखे प्रकार वैद्यकीय क्षेत्रांत आज सर्रासपणे होताना दिसतात. सामान्य तक्रारीच्या गुन्ह्यांत वर्षोनुवर्षे तारखांवर तारखा देणे आणि या कालावधीत वकिलांचे खिसे भरणे यासारखे प्रकारही एक प्रकारे भ्रष्टाचारच आहे. अनधिकृत मद्याची दुकाने, बार, जुगाराचे अड्डे, वेश्यालये, अनधिकृत फेरीवाले, अनधिकृतपणे उभ्या राहत असलेल्या वस्त्या आणि बांधकामे यासर्वांमध्ये स्थानिक पोलिसांचे आर्थिक लागेबांधे असतात हे सर्वांनाच ज्ञात आहे. वाहतूक पोलीस पावती न देता चिरीमिरीच्या मोबदल्यात पकडलेली वाहने सोडतात. इतकेच नव्हे तर फळांच्या आणि भाज्यांच्या दुकानात विक्रेता वजनात फेरफार करतो हाही भ्रष्टाचारच आहे, पिठाच्या गिरणीत चक्कीवाला पीठ कमी देतो, दूधवाला दुधात पाणी मिश्र करून देतो, मिठाईवाला नव्या मिठाईचे पैसे घेऊन जुनी मिठाई देतो, बनावट पनीर आणि मावा विकतो हा सर्व प्रकार भ्रष्टाचारातच मोडतो. मासिक वेतनाव्यतिरीक्त अधिक पैसे मिळावेत, कमी मालाच्या मोबदल्यात जास्त नफा मिळावा यासाठी सामान्य व्यक्तीला लुबाडणे, त्याची फसवणूक करणे, त्याच्यावर दबाव आणणे, त्याला परावृत्त करणे यांसारखे सर्व प्रकार भ्रष्टाचारामुळे घडतात आणि यामागे दडलेला असतो तो कमालीचा स्वार्थ तो साधण्यासाठी इतरांचे कितीही नुकसान झाले तरी चालेल पण माझा स्वार्थ साधला जायला हवा ही असुरी वृत्ती, झटपट श्रीमंत होण्याची असूया आणि माझे कोणी वाकडे करू शकणार नाही हा फाजील आत्मविश्वास. भ्रष्टाचारासाठी दिलेला पैसा हा सामान्य माणसाच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा मोबदला असतो. इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार ? अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वार्थासाठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते. २०२३ मध्ये राज्याच्या लाच लुचपत विभागाने टाकलेल्या ८१२ धाडींपैकी केवळ ९३ जणांवर दोषारोपपत्र प्रविष्ट होणे याचा अर्थ स्पष्ट आहे की एकूणच तपास यंत्रणेत दोष आहेत ज्याचा लाभ भ्रष्टाचाऱ्यांना मिळत आहे. रंगेहात पकडले गेलेले भ्रष्टाचारी सुद्धा निर्दोष सुटतात यावरून भ्रष्टाचार कोणत्या स्तरापर्यंत पोहोचला आहे याची आपल्याला कल्पना येईल. भ्रष्टाचाराच्या समूळ उच्चाटनासाठी राजकीय इच्छाशक्ती असणे आणि त्यासाठी सरकारमधील लोकप्रतिनिधी नीतिमान असणे अत्यंत आवश्यक आहे. आजमितीला सत्तास्थानी असलेल्या अनेक मंत्र्यांवर आणि लोकप्रतिनिधींवर कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींचीही स्थिती यापेक्षा वेगळी नाही. देशातून भ्रष्टाचाराची कीड उखडून टाकायची असेल तर सत्तेवर नीतिमान लोकप्रतिनिधी नेमणे गरजेचे आहे. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणुकांच्या निमित्ताने ही संधी चालून आली आहे त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने मतदानासाठी घराबाहेर पडून आपले अमूल्य मत नीतिमान उमेदवाराला देऊन देशाला भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी हातभार लावूया !



## उत्तम आरोग्य हिच सर्वोत्कृष्ट संपत्ती



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**वारे माप संपत्ती खर्च करून देखील एकदा शरिर खचल तर पुन्हा हेच शरिर त्या पद्धतीने मिळवता येत नाही हे अगदी वास्तव असताना देखील आपण आपल्या शरिराकडे प्रचंड दुर्लक्ष करतो हे दुर्दैव आहे. आपलं आरोग्य आपण उत्तमपणे सांभाळलं पाहिजे.आपल्या आरोग्य विषयी आपण फार गंभीर नाहीत हे तर सत्य कोणीही नाकारू शकत नाही.आपण आपलं आरोग्य न सांभाळता ते जास्तीत जास्त खिळखिळ कसं होईल याच दिशेने प्रयत्न करतो.जीवन विषयक नियमांच काटेकोर पालन केले तर उत्तम आरोग्य राहण्यासाठी काही बाधा येत नाही.उत्तम आरोग्य हिच सर्वोत्कृष्ट संपत्ती असुन देखील याच अनमोल संपत्ती कडे आपण कानाडोळा करत आहेत.**

मग एकाएकी आरोग्य विषयक समस्या निर्माण झाल्या कि मग मात्र आपण चिंतातुर होतो. मुळात योग्य वेळी योग्य दक्षता घेतली तर आरोग्य विषयक समस्या आपल्याला जास्त भेडसावणार नाहीत. आरोग्य हे अनमोल असं धन आहे. ज्याच्या समोर भौतिक धन द्रव्य संपत्ती हि शुल्क आहे.पण आपण हिरे माणिक मोती सोडुन कवड्या रेवडया वेचित बसलो आहेत. जगातील कोणत्याही प्रकारची संपती देऊन सुद्धा आरोग्य मिळत नाही. हे आपण जाणतो पण अनुकरण करताना गडबड होते. म्हणून आपण निरोगी राहण्यासाठी काहिच करत नाहीत. दैनंदिन जीवनातील बदलती जीवनशैली कमी होत चाललेले श्रम,प्रचंड मोठ्या प्रमाणात आहारात फास्ट फूडचा वापर,सेंद्रिय खाद्य पदार्थां ऐवजी रासायनिक खाद्य पदार्थ युक्त अन्नाचा वाढता वापर,यामुळे वाढत चाललेल्या आरोग्य विषयक समस्या विद्यमान युगासाठी चिंतेची बाब आहेत. आपले आजोबा पंजोबा यांचं वयोमान आणि आपल सध्याचं वयोमान विचार केला तर अर्ध्यावर आपण पोहचलो आहोत.पन्नास साठ वर्षा अगोदर सर्व साधारण पणे वयोमान शंभर वर्षे होत म्हणजे बहुतांश लोक शंभर वर्ष पूर्ण करत आणि आज आपण पन्नास साठ वर आलोय.म्हणजे हि प्रगती आहे कि अधोगती आहे. याच चिंतन आपण कधी करणार आहोत कि नाही ही अवस्था का निर्माण झाली आहे याचा विचार झाला पाहिजे. त्या काळी कोणत्याही प्रकारच्या आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध नसताना देखील वयोमान तितकं जास्त होत.पण आज सगळीकडे आरोग्य सेवा सुविधा दिवसेंदिवस प्रगती होत असताना देखील आरोग्य बाबत विविध समस्या उद्भवत आहेत.आरोग्य हिच सध्याची सगळ्यात मोठी समस्या आहे.नियत वयोमान कमी होत आहे.महणून आरोग्य हे नेहमी उत्तम असलं पाहिजे.जीवनशैली बदलत चालली आहे त्याचा थेट परिणाम आपल्या शरीरावर होऊन आपलं आरोग्य धोक्यात येत आहे. शरिराला आवश्यक श्रम करण्यात आपण कमालीचा हलगर्जीपणा निष्काळजीपणा करत आहेत.जीवन जरी सहज मिळालेल असलं तरी देखील ते अनमोल आहे याची जाणीव आपल्याला नसल्याने आपल्याला त्याच मुल्य नाही हि शोकांतिका आहे.शरिर नश्वर आहे आत्मा अमर आहे हे जरी सत्य असल तरी सुद्धा जीवन चालण्यासाठी अन्न पाणी हेच मुख्य घटक आहेत. अन्न पाणी शुद्ध असेल शरिराला आवश्यक तितक कष्ट असेल तर आरोग्य संतुलित रहात त्यासाठी आहाराचं पण संतुलन आवश्यक असतं. नियमित व्यायाम अथवा शारिरीक कसरत पुरेसा सकस आहार, पुरेसा गरजेपुरता आराम केला तर आरोग्य व्यवस्थित राहत. मुळात व्यसनाधीनता, रासायनिक खतांच्या मात्रा आति वापरामुळे दूषित अन्न खाद्य पदार्थ यामध्ये वाढती भेसळ म्हणजे अप्रत्यक्ष पणे आपण आपल्या आरोग्य सोबत खेळत आहोत. आजारी असताना आपण लाखो रुपये खर्च करून बरं होण्यासाठी प्रयत्न करतो. पण जेव्हा आपण बरे असतो अथवा आजारी नसतो. तेव्हा मात्र आपण आजारी पडणार नाहीत यासाठी कोणत्याही प्रकारची दक्षता घेत नाहीत हे विशेषच आहे. हवेतील प्रदूषणामुळे शरीरावर विपरीत परिणाम होत असताना देखील हे प्रदुषण कमी करण्यासाठी अथवा रोखण्यासाठी आपण आवश्यक ते प्रयत्न करणं गरजेचं आहे. निरोगी शरिर होण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते ते आपण केलं पाहिजे. शरिरासाठी वेळ दिला पाहिजे. आपल शरिर हिच आपली संपत्ती आहे. आपल्या संपत्तीचे संवर्धन आणि संरक्षण करणं आपलं कर्तव्य जबाबदारी आहे. याची जाणीव आपण ठेवायला हवी आणि हिच जाणीव ठेवून दैनंदिन जीवनात आहार विहार शारिरीक श्रम हे संतुलन साधलं तर निश्चितच जीवन हित होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जागा वाटपाचा तिढा सुटणार की नाही ?

## बैठकांचा जोर सुरुच; आज पुन्हा महाविकास आघाडीची बैठक!

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** लोकसभेच्या जागावाटपाबाबत महाविकास आघाडीमधील वाद तसेच काही जागांसाठी उमेदवारांची दावेदारी अजून सुरुच आहे. त्यामुळे गुरुवारी पुन्हा एकदा महाविकास आघाडीमधील मातब्बर नेत्यांची हॉटेल ट्रायडंटमध्ये सांगली, भिवंडी आणि दक्षिण मध्य मुंबई जागेबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे. या बैठकीमध्येच तिन्ही जागांवर अंतिम निर्ण होईल अशी चर्चा आहे.

या बैठकीसाठी काँग्रेसकडून बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण हे असणार आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून उद्धव ठाकरे यांच्यासह संजय राऊत सुद्धा उपस्थित असणार आहेत, तर शरद पवार गटाकडून स्वतः शरद पवार उपस्थित असतील. या बैठकीमध्ये तरी महाविकास आघाडीच्या जागा वाटपाचा तिढा सुटणार की नाही याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गटाकडून 17 उमेदवार जाहीर करण्यात आल्यानंतर काँग्रेसमध्ये कमालीची नाराजी पसरली आहे. त्यामुळे धुसपूस सुरु झाल्याची चर्चा आहे. यामध्ये प्रामुख्याने सांगली, भिवंडी, दक्षिण मुद्दे मुंबई जागेचा समावेश आहे. या तिन्ही जागांवर महाविकास आघाडीमधील तिन्ही पक्षांचा दावा आहे.

ठाकरेंकडून सांगलीमध्ये आणि दक्षिण मध्य मुंबईमध्ये उमेदवार जाहीर करण्यात आल्याने काँग्रेस नेत्यांची चांगलीच गोची झाली आहे.

दुसरीकडे सांगलीच्या जागेसाठी काँग्रेस आमदार विश्वजित कदम यांनी थेट दिल्लीपर्यंत धडक दिल्याने सुद्धा महाविकास आघाडीमध्ये तणाव चांगलाच वाढला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आजची होणारी बैठक महाविकास आघाडीची थोडी वादळी होण्याची शक्यता आहे.

दुसऱ्या बाजूने महाविकास आघाडीकडून महाराष्ट्रामध्ये संयुक्त सभा घेण्यासाठी सुद्धा रणनीती आखली जात आहे. यामध्ये उद्धव ठाकरे आणि शरद पवार आणि राज्यातील काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून संयुक्त सभा होणार आहेत. त्यामुळे एक प्रकारे महाराष्ट्रामध्ये राजकीय वातावरण तापणार आहे.

महाराष्ट्रामध्ये पाच टप्प्यांमध्ये निवडणूक होणार असून त्यानुसार या सभांचे नियोजन केले जाईल. महाविकास आघाडीची एकसंधपणा आणि ताकद दिसावी तसेच पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये ज्या ठिकाणी नाराजी असेल त्या ठिकाणी नाराजी दूर व्हावी व उमेदवाराला एक प्रकारे ताकद मिळावी या दृष्टिकोनातून या संयुक्त सभांचे नियोजन महाविकास आघाडीकडून केले जात आहे.

दुसरीकडे काँग्रेसची जागांवरून चर्चा सुरू असतानाच विदर्भातील रामटेकमध्ये जाहीर केलेल्या उमेदवार रश्मी बर्वे यांची उमेदवारी रद्द होण्याची टांगती तलवार आहे. रश्मी बर्वे यांचे जात प्रमाणपत्र आणि जात हे दोन्ही रद्द करण्यात आल्याने तगडा झटका बसला आहे. त्यामुळे त्यांच्या उमेदवारीवर टांगटी तलवार आहे.

दुसरीकडे त्यांचे पती शामकुमार बर्वे यांच्या सुद्धा उमेदवारी अर्जावर आक्षेप घेतला जाण्याची शक्यता आहे. रश्मी बर्वे यांनी जोडलेल्या एबी फॉर्मवरती शामकुमार बर्वे यांचं नाव पाचव्या क्रमांकावर असल्याने त्यांच्या उमेदवारीवरती आक्षेप घेतला जाण्याची शक्यता आहे.

# तडीपार गुंडांचा शहरात वावर, चौघांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** पिंपरी, चिंचवड आणि वाकड पोलिसांनी तीन वेगवेगळ्या कारवायांमध्ये दोन तडीपार गुंडांसह चौघांना अटक केली. त्यामध्ये पिस्तूल आणि दोन कोयते अशी शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तडीपार गुंडांचा शहरात वावर असल्याचे दिसून येत आहे.

आनंद नामदेव दनाने (वय ३१, रा. विद्यानगर, चिंचवड) असे पिंपरी पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी आनंद याला पिंपरी-चिंचवड पोलिसांनी १२ फेब्रुवारी २०२४ रोजी दोन वर्षांसाठी पुणे जिल्ह्यातून तडीपार केले आहे. त्याचा तडीपारीचा कालावधी संपण्यापूर्वी तो शहराच्या हद्दीत आला असल्याची माहिती पिंपरी पोलिसांना मिळाली. आनंदला ताब्यात घेत त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक कोयता आढळून आला. विकास उर्फ विक्या अंकुश भिसे (वय २७, रा. दळवीनगर झोपडपट्टी, चिंचवड) असे चिंचवड पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. विकासला दोन नोव्हेंबर २०२३ रोजी पुणे जिल्ह्यातून तडीपार केले आहे. त्याचा तडीपारीचा कालावधी संपण्यापूर्वी तो शहरात आला. त्याला चिंचवड पोलिसांनी दळवीनगर येथून अटक केली. त्याच्याकडून एक कोयता जप्त करण्यात आला आहे. वाकड पोलिसांनी माउली उर्फ ज्ञानेश्वर सुबराव पवार (वय २३, रा. पवारनगर, थेरगाव), अजय म्हस्के (रा. थेरगाव) यांना अटक केली आहे. आरोपी थेरगाव येथे पिस्तूल घेऊन थांबल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ५० हजार रुपये किमतीचे एक पिस्तूल आणि दोन हजार रुपये किमतीचे एक काडतूस जप्त करण्यात आले आहे.

# बसची दुचाकीला धडक; दुचाकीस्वार ठार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजी नगर :** सिल्लोड राष्ट्रीय महामार्गावरील खामगाव फाट्यावर मंगळवार रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास बसने दुचाकी स्वारास पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला. रंगनाथ तुकाराम रसाळ (६५ रा. लिहा, ता. फुलंब्री) असे लिहा येथील रंगनाथ तुकाराम रसाळ हे दुचाकी क्र. एमएच २० सीजी ८७६२ वरून खामगाव फाटा येथून वळण घेवून फरशी फाट्याकडे जात असताना सिल्लोडकडून येणाऱ्या एसटी महामंडळच्या बस क्र. एमएच २०, बीएल ३४५५ या बसने पाठीमागून त्यांना जोराची धडक दिली रसाळ यांना फुलंब्री येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले यावेळी त्यांना तपासून डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली असा परिवार आहे.

# अंनिसतर्फे देहदान, अवयवदान सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या शहीद दिनानिमित्त संपूर्ण सप्ताह महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने देहदान आणि अवयवदान सप्ताह म्हणून राबवला जात आहे. यानिमित्ताने देहदान आणि अवयवदानचा प्रचार आणि प्रसार केला जात असून यासंदर्भात नागरिकांमध्ये असलेले गैरसमजही दूर करण्यात येत आहेत. देहदान, अवयवदानाला सध्याच्या धावपळीच्या जगात अनन्यसाधारण महत्व आहे. भारतात याबाबत जनजागृती, प्रचार आणि प्रसार कमी असल्याने वैद्यकीय अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ५० विद्यार्थ्यांमागे केवळ एक मृतदेह मिळतो. साधारणपणे १० विद्यार्थ्यांमागे एक मृतदेह मिळाला तर विद्यार्थी चांगल्या पद्धतीने अभ्यास व संशोधन करू शकतात. युरोपमध्ये हेच प्रमाण पाच विद्यार्थ्यांमागे एक मृतदेह असे आहे. देशात शहरी भागासह ग्रामीण भागातही देहदान आणि अवयवदान याविषयी अनेक गैरसमज आहेत. त्यामुळे सहसा कोणी त्यासाठी तयार होत नाहीत. गैहसमज हा देहदान, अवयवदान चळवळीतील एक मोठा अडथळा आहे. गैरसमज दूर करण्यासाठी विविध संस्थांकडून प्रबोधन करण्यात येत आहेत. देहदान किंवा अवयवदान करण्याची इच्छा असलेल्या अनेकांना या प्रक्रियेसंदर्भात माहिती नसल्याचेही दिसून येते. त्याविषयीही अंनिसकडून प्रबोधन केले जात आहे. मरणोत्तर देहदान करण्याची इच्छा असणाऱ्यांनी आपला अर्ज जवळच्या वैद्यकीय महाविद्यालयात भरणे आवश्यक असते. अवयवांचे प्रत्यारोपण ही आधुनिक विज्ञानाची मोठी देणगी आहे. शासनातर्फे यासाठी पुढाकार घेतला जात आहे. साधारणपणे भारतात दरवर्षी पाच लाख मृत्यू हे केवळ अवयव उपलब्ध न झाल्यामुळे होतात. निकामी झालेले अवयव दुरुस्त करणे किंवा नवीन प्रत्यारोपण हे तंत्र आता विकसित झाले आहे. श्रीलंकेत मानवी अवयव ही राष्ट्रीय संपत्ती म्हणून ग्राह्य धरली जाते. तिथे व्यक्ती मृत झाल्यानंतर त्याचे शरीर सरकारजमा होते.



# आंतरराज्य क्रीडा स्पर्धेत महावितरणचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मध्य प्रदेशातील जबलपूर येथे नुकत्याच झालेल्या ४५ व्या अखिल भारतीय आंतर विद्युत क्रीडा स्पर्धेत महावितरणच्या संघाने बॉडी बिल्डिंग व पॉवर लिफ्टिंग या खेळात लक्षणीय यश मिळवले.

महावितरणतर्फे या स्पर्धेत एकूण ७ जणांनी सहभाग घेतला होता. यात बॉडी बिल्डिंग क्रीडा प्रकारात राहुल कांबळे व विशाल मोहाळे यांनी रौप्यपदक तसेच सूरज कोंगे व अमित पाटील यांनी कांस्यपदक पटकावले. छत्रपती संभाजीनगर येथील वाळूज एमआयडीसी शाखेचे सहायक अभियंता रवी मिरगणे यांनी पॉवर लिफ्टींगमध्ये कांस्यपदक पटकावले. याच प्रकारात महवितरणने सांघिक तृतीय पारितोषिक मिळवले. महावितरणने या स्पर्धेत एकूण सहा पदके पटकावली. महावितरण संघाचे टीम लीडर व व्यवस्थापक म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल शाखेचे सहायक अभियंता राजेंद्र राठोड यांनी जबाबदारी पार पाडली. या यशाबद्दल मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी रवी मिरगणे व राजेंद्र राठोड यांचा सन्मान केला. यावेळी अधीक्षक अभियंता बीना सावंत, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, अतिरिक्त कार्यकारी अभियंता विष्णू नवले उपस्थित होते.

# सावळदबारा येथील आरोग्य वर्धिनी केंद्र चालते एका पडक्या खोलीत

## बोगस ठेकेदाराला कोणाचा आशिर्वाद

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील आयुष्मान भारत आरोग्य वर्धिनी केंद्र पाच ते सहा वर्षांपासुन अपुर्ण अवस्थेमधे धुळखात पडुन असुन या आरोग्य केंद्रामधे घाणीचे साम्राज्य निर्माण होऊन त्यात गावातील मोकाट कुत्रे रहिवास करुन राहत असुन शासन प्रशासन यांच या प्रकरणाकडे पुर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे दिसुन येत आहे. सावळदबारा येथे आयुष्मान भारत आरोग्य वर्धिनी केंद्राच्या इमारतच्या बांधकामावरती शासनाने कोठ्यवधी रुपय खर्च करुन ही हे आरोग्य केंद्र आज ही धुळखात पडुन आहे या आरोग्य केंद्राच्या इमारत चे बांधकाम नित्कृष्ट दर्जाचे बोगस काम झालेले असुन या इमारत ला सुरुवात करण्या अगोदरच भिंतीला मोठ मोठे तढे गेलेले आहे त्यात काहि ठिकाणी तर पाईप फुटलेले आढळुन आले तर काही ठिकाणी खिडक्या दवाज्यांच्या काचा फुटलेल्या असुन ही इमारत भंगार अवस्थेमधे अंधारामधे धुळखात पडुन आहे सावळदबारा अठरा गावांचे केंद्र असुन हे आरोग्य केंद्र एक पडक्या जिल्हा परिषदेच्या शाळेच्या खोलीमधे चालविले जात आहे त्या खोलीमधे औषधी साठा आणि इतर साहित्य ठेवायला जागा शिल्लक उरलेली नसुन रुग्नाचा उपचार करायचा कुठ हा मोठा प्रश्न येथील डाक्टर आणि कर्मचा-यांना पडलेला आहे आरोग्य केंद्र चालविण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे आशासेविका यांची मिटींग पडक्या छताखाली घेतली जात आहे यामुळे मोठी दुर्घटना होऊ शकती हे मात्र नाकारता येत नाही या ठीकाणी 8 कर्मचारी रुजु असुन 18 कर्मचारी रिक्त पदे असुन तीन वैद्यकीय अधिकारी यांची पोस्ट असुन हजर फक्त एकच वैद्यकीय अधिकारी असल्याची ही माहिती समोर आलेली आहे कोठ्यवधी रुपयांच्या इमारतचे काम नित्कृष्ट दर्जाचे व अपुर्ण काम करुन ठेकेदाराने वरती हात करुन पळ काढलेला आहे या बेजबाबदार पणाला नेमके कोन दोषी आहे असा प्रश्न जनतेला भासावत आहे.




# काव्य-चरितावली

पुष्प ७१वे

आधुनिक केसरी

श्री महाराजांचे सांगणे । ते नीट समजून घेणे ।कल्याण साधणे । यातुनी ।। १ ।। करायची असेल परमर्थी प्रगती । मनी यावी जागृती ।नाहीशी करावी वृत्ती । मी, "मीपणाची ।। २ ।। भक्तांनी काय मागावे । रामचरणी काय सांगावे ।भान याचे ठेवावे । सांगती महाराज ।। ३ ।। श्री महाराज म्हणती । न मागता लोक तुम्हा देती । आपण ही द्याव्या गोष्टी । न मागता आप्त-गरिबांना ।। ४ ।। भगवंत नाम कार्य करते । सर्व वाईटाचा नाश करते । मन नामस्मरणी रंगते । रामरायाच्या कृपेने ।। ५ ।। नाम घ्यावे । अन प्रापंचिक सुख मागावे । याने कल्याण कसे व्हावे । दुःखच पदरात शेवटी ।। ६ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# एमआयडीसीचे प्लॉट बिल्डर्सच्या घशात घालण्यासाठी अधिकाऱ्यांसोबत संगनमत

## भूसंपादनात जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांचा पत्रकार परिषदेत आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** एमआयडीसीसाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांना अंधारात ठेवून परस्पर काही उद्योगपती तसेच बिल्डर्स यांच्याशी संगनमत करुन एमआयडीसीचे अधिकारी राखीव ओपन स्पेस ॲमिनिटीचे प्लॉट गिळंकृत करीत असल्याचा गंभीर आरोप संबंधीत शेतकऱ्यांनी आज पत्रकार परिषदेत केला. तसेच हा भुखंड गिळंकृत करण्याचा कार्यक्रम गेल्या कित्येक महिन्यांपासून सुरु असून याविरुध्द शेतकऱ्यांनी आवाज उठवत राज्य सरकारने त्वरीत कारवाई करण्याची आणि सदर प्लॉटची अलौटमेंट थांबवण्याची मागणी केली आहे.

आज दि. २८ मार्च रोजी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनात शरद शालीग्राम वाघ, विलास शालीग्राम पाटील, कैलास पोपट पाटील आदी शेतकऱ्यांनी पत्रकार परिषद घेत सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, अवधान येथील एमआयडीसी उभारणीसाठी झालेल्या भुसंपादनात



विलास शालीग्राम पाटील, कैलास पोपट पाटील, शरद शालीग्राम वाघ, शरद पोपट पाटील, विकास अर्जुन वाघ, रोशन कैलास वाघ, शेखर विकास वाघ, राजेंद्र शालीग्राम पाटील, कृष्णा विलास पाटील, विश्वास बुधाजी पाटील, धर्मराज महादू वाघ यांच्या वडीलोपार्जित जमिनी ३० ते ४० वर्षापुर्वी एमआयडीसीसाठी अधिग्रहीत केल्या गेल्या आहेत. प्रत्येक शेतकऱ्याचे १० ते १५ एकर जमिनी घेण्यात आल्या आहेत. आणि हे शेतकरी काही वर्षापासून धुळे आर.ओ. ऑफिस मध्ये खेटा मारत असून ॲमिनीटीच्या जागेतील पी.ए.पी.चे प्लॉटची मागणी करीत आहोत, त्याची ओ.सी. देखील आमच्याकडे आहे.

धुळे एम.आय.डी.सी. येथील एक्स-१ प्लॉटच्या पाठीमागील ॲमिनिटीच्या प्लॉट ज्या प्लॉट मध्ये भुसंपादीत शेतकऱ्यांना १००-१०० मिटर चे प्लॉट केलेले आहेत. आणि सदर एक्स-१ प्लॉट च्या पाठीमागील ७२० स्के.मि. ची ॲमिनिटीच्या जागेत ५ (पाच) भुसंपादीत शेतकऱ्यांची मुले हे छोटे छोटे स्टॉल, त्यात पानटपरी, चहा-नाश्तची हॉटेल, किराणा दुकान, पाणी पुरीचा व्यवसाय करुन सद्यस्थितीत त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. मात्र ७२० स्के. मिटरच्या ॲमिनिटीच्या जागेची मागणी व तेथील पाडलेल्या छोट्या छोट्या प्लॉटची मागणी ज्यांचा क्रमांक एक्स-६, एक्स-७, एक्स-८, एक्स-९ असा आहे. ते प्लॉट भुसंपादीत आम्ही काही शेतकरी एम.आय.डी.सी.अ आर.ओ. धुळे यांच्याकडून एम.आय.डी.सी.ची जी शासकीय रक्कम आहे ती भरुन हे प्लॉट घेण्यास तयार असतांना देखील काही दिवसांपुर्वी या धुळे एम.आय.डी.सी.चे आर.ओ. अनिल गावीत सर कार्यकारी अभियंता व्यास सर, एरिया मॅनेजर श्रीमती रेखा कोकणी मॅडम व डेप्युटी सी.ई.ओ.क्र.३ मरोळ एम.आय.डी.सी. अंधेरी (पुर्व) मुंबई -९३ हे सर्व अधिकारी यांनी या एक्स-१ प्लॉटच्या पाठीमागील एक्स-६, एक्स-७, एक्स-८, एक्स-९ या प्लॉटची कुठलीही ई-निवीदा पद्धत न काढता एका बलाढ्य बिल्डर यांना शासकीय किंमत सोडून अतिरिक्त रक्कम घेवून हे प्लॉट परस्पर देण्याचा प्रकार सुरु केला. प्लॉटची २५% रक्कम ह्या बिल्डरने गेल्या १५ दिवसापुर्वी भरली आहे. तरी आम्ही काही भुसंपादीत शेतकरी ज्यांची सद्यस्थिती त्या जागेवर उदरनिर्वाहाची स्टॉल चालू आहेत. म्हणून ही जागा जरी ॲमिनिटीची असेल तरी या जागेसाठी या बिल्डरने जी शासकीय रक्कम भरलेली आहे. त्यापेक्षा जास्तीची शासकीय रक्कम आम्ही भुसंपादीत शेतकरी भरण्यास तयार आहोत. त्यामुळे या बिल्डर ७५% रक्कम भरण्यापुर्वी सदर प्लॉटची अलौटमेंट त्वरीत थांबविण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी पत्रकार परिषदेव्दारे केली.



# जंजाळ यांच्या हस्ते खुशी मेडिकलचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** त्रिमूर्ती चौक येथे रविवारी खुशी मेडिकलचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख तथा मा उपमहापौर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी संत निरंकारी मंडळाच्या कमल दीदी यांनीही येथे उपस्थिती लावून आशीर्वाद दिले या दिवशी भव्य रक्तदान शिबिर व तपासणी करण्यात आली यामध्ये 150 पेशंट तपासण्यात आले यामध्ये खुशी मेडिकल मध्ये बीपी शुगर इत्यादी मेडिकल 10 टक्के ते 70 टक्के सूट देण्यात येणार आहे व घरपोच सेवा देण्यात येणार आहे घरपोच सेवेसाठी मोबाईल नंबर 8459465948, 9890438995, 9404015449. या नंबर वरती संपर्क करावा मेडिकल सुविधा 24 तास राहणार आहे. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

# यंदा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज!

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** ग्लोबल वॉर्मिंगमुळे जागतिक पातळीवर होणारे हवामान बदल आणि त्याचा इतर गोष्टींवर होणारा विपरीत परिणाम ही सध्या सर्वच देशांसाठी चिंतेची बाब ठरली आहे. या पार्श्वभूमीवर हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका शेती क्षेत्राला बसताना दिसत आहे. यासंदर्भात नुकताच APEC अर्थात एशियन-पॅसिफिक इकोनॉमिक कोऑपरेशन क्लायमेट सेंटरनं या वर्षीचा पावसाचा अंदाज वर्तवला आहे. यानुसार भारतात यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार असल्याचा अंदाज नमूद करण्यात आला आहे. त्यामुळे बळीराजासाठी ही आनंदाची बातमी असून त्यामुळे शेतकरी वर्गाला काही प्रमाणात दिलासा मिळेल असं सांगितलं जात आहे.

APEC नं एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीसाठी जागतिक स्तरावर कुठे कसा व किती पाऊस पडेल? हवामान कसं राहील? यासंदर्भात अंदाज वर्तवले आहेत. त्यामध्ये भारतासाठी सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारतीय हवामान खात्याच्या हवाल्याने द हिंदूनं दिलेल्या वृत्तामध्येही यंदा मान्सून सरासरीपेक्षा जास्त होईल असं नमूद करण्यात आलं आहे.

दरम्यान, APEC नं १५ मार्च २०२४ रोजी ENSO अर्थात अल निनो साऊदन्र ऑसायलेशन ही यंत्रणा वापरात आणली असून त्यानुसार एप्रिल ते सप्टेंबर २०२४ या काळात ला निनाचा मान्सूनवर प्रभाव दिसून येईल. मार्च ते मे २०२४ दरम्यान देशात अल निनोचा प्रभाव दिसून येईल. त्यानंतर मात्र जून ते सप्टेंबर या काळात ला निनाच्या स्थितीमुळे पावसाच्या प्रमाणावर सकारात्मक परिणाम होताना दिसू शकेल, अस अंदाजही APEC नं वर्तवला आहे.

# गोदावरी नदीपात्रातून बारा विद्युतपंप चोरीस

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश भोंगळ**

**कोळपेवाडी :** सुरेगाव परिसरात गोदावरी नदीपात्रातून तब्बल बारा विद्युतपंप चोरीस गेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला असून एकप्रकारे चोरट्यांनी पोलीस यत्रंणेलाच आव्हान देले आहे आहे.

सुरेगाव गोदावरी नदीपात्रातुन शेतीसाठी इंधन विहिरीतुन विद्युत पंपाच्या सहाय्याने पाणी पुरवठा करणाऱ्या तब्बल १२ मोटारींचे हजारो रुपयांचे तांबे लंपास करुन शेतकऱ्यांचे नुकसान करत पोलीस यंत्रणेला चोरट्यांनी 'हम जैसे शातीर चोरो को पकडना पुलीस के लिए नामुमकिन नहीं' जणू असे आव्हान दिले आहे. बक्तरपुर, चासनळी, सुरेगाव, कोळगावथडी कोळपेवाडीसह अनेक गावांमध्ये चोरट्यांनी विद्युत पंपाना आपले लक्ष बनवले आहे. त्यामुळे शेतातील उभ्या पिकाला पाणी द्यायचे कसे? असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे पडला आहे. सुरेगाव येथील शेतकरी युवराज मेहरखांब यांच्यासह ११ शेतकऱ्यांनी याबाबत कोपरगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्यादीत, दि. २५ मार्च मध्यरात्री ते २६ मार्च सकाळी साडेदहा च्या कालावधी मध्ये अज्ञात चोरट्यांनी



चालू असलेल्या १२ विद्युत मोटारी फोडून त्यातील तांब्याच्या धातूची चोरी करुन आमचे हजारो रुपयाचे नुकसान केल्याचे म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्द भा.द.संहिता १८६० नुसार ३७९ ४२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक संदिप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पो.कॉ. गजानन वाढेंकर अधिक तपास करत आहे.

घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक महेश कुशारे यांनी भेट देवून पंचनामा केला. सामाजिक कार्यकर्ते मोतीराम निकम यांनी या अगोदर झालेल्या चोरीचा पाढा पोलिसांना वाचुन दाखवत तपास जलद गतीने लावण्याची मागणी केली. वडगाव - बक्तरपुर पासून ते वारी कान्हेगाव पर्यंत जवळपास ७० किलोमीटर लांबीचे तालुक्यास गोदावरी नदीचे विस्तिर्ण पात्र लाभले आहे. सहकार महर्षी शंकरराव काळे व शंकरराव कोल्हे यांच्या उदारमतवादातुन दोन्ही कारखान्यांच्या सहकार्याने गोदावरी नदी पात्रात कोल्हापूर टाईपचे बंधारे बांधुन शेती व्यवसायास बळकटी देण्याचे काम केल्याने तालुक्यात शेती व्यवसाय बहरु लागला आहे, मात्र चोरट्यांचा होणाऱ्या वारंवार होणाऱ्या त्रासामुळे गोदावरी नदी पात्रावर अवलंबून असणारा शेतकरी वर्ग पुरता हैराण झाला आहे. तालुक्यातील पश्चिम भागातील सूरेगाव, चासनळी भागामध्ये अवैध व्यवसायाने चांगलेच बस्तान मांडल्याने व्यसनाधीन तरुण नशेच्या आहारी जावुन गुन्हेगारीकडे वळत असल्याचे विदारक चित्र बघावयास मिळत आहे.

# अमरावतीतून भाजपाच्या तिकिटावर नवनीत राणा निवडणूक लढवणार

## खासदार नवनीत राणांचा भाजपा प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** लोकसभा उमेदवारांची भाजपाची सातवी यादी नुकतीच जाहीर झाली. त्यात अमरावतीतून नवनीत राणा यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नुकताच नवनीत राणा यांनी भाजपात प्रवेश केला. भाजपात प्रवेश करण्याआधी त्यांनी युवा स्वाभिमान पक्षाचा राजीनामा दिला. त्यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले होते. एका छोट्या संघटनेला जिल्ह्यात पक्षाचे मोठे रुप देणे महत्त्वाचे होते. याच पक्षाने आमदार आणि खासदारही दिला. आता मोठी जबाबदारी माझ्यावर आहे. मला या पक्षाचा राजीनामा देताना धाकधूक आहे. स्वतःच्या पक्षात काम करणे आणि त्यानंतर नवी इनिंग सुरु करणे हे आव्हानात्मक आहे. आता डोळ्यात आनंदाचे अश्रू आहेत. आज माझे डोळे पाणावले आहेत, जे होणे साहजिक आहे, असे नवनीत राणांनी म्हटले आहे. खासदार नवनीत राणा यांना भाजपाने सातव्या यादीत अमरावतीतून तिकिट दिलं आहे. नवनीत राणा बनावट जात प्रमाणपत्र सादर करून अमरावतीची लोकसभा निवडणूक लढल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. अलीकडेच मुंबई उच्च न्यायालयाने राणा यांचं जातप्रमाणपत्र रद्द करावं असा निर्णय



दिला. परंतु, या निर्णयाला राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आवाहन दिलं. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या राणा यांच्या याचिकेवरील निकाल सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवला आहे. या जातप्रमाणपत्राच्या प्रकरणामुळे राणा यांच्या उमेदवारीसमोर अडचणी येत होत्या. मागील लोकसभा निवडणुकीत (२०१९) नवनीत राणा या राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत उमेदवार होत्या. त्यावेळी त्यांनी शिवसेनेचे तेव्हाचे खासदार आनंदराव अडसूळ यांचा पराभव केला होता. नवनीत राणा यांना भाजपाने तिकिट दिल्यानंतर बच्चू कडू यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसंच आम्ही त्यांना पाडणारच असा निर्धारही बोलून दाखवला आहे. अशात आता अमरावतीत काय होणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. नवनीत कौर-राणा या चित्रपट अभिनेत्री होत्या. यांनी बडनेराचे आमदार रवी राणा यांच्याशी २०११ मध्ये विवाह केला. त्यानंतर त्यांनी अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळवले होते. २०१४ च्या निवडणुकीत नवनीत राणा यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारीवर संघातून निवडणूक लढवली होती. परंतु, त्यावेळी शिवसेनेच्या आनंदराव अडसूळ यांनी राणा यांचा तब्बल १ लाख ३७ हजार मतांनी पराभव केला होता. राणांच्या जात प्रमाणपत्राविरोधात २०१७ मध्ये आनंदराव अडसूळ यांनी याचिका दाखल केली होती.

# पेमेंटसाठी पाटबंधारे कार्यालयासमोर कोरडे दाम्पत्याचे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** जायकवाडी प्रकल्प अंतर्गत भूसंपादन प्रकरणी कोर्टाच्या वाढीव पेमेंटच्या निकालाचा आदेश होऊन १३ वर्षे झाली तरी व्याजासह पैसे न दिल्याच्या निषेधार्थ व कोर्टाचा आवमान केला म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाच्या समोर दि.२७ मार्च रोजी नेवासा तालुक्यातील खेडले काजळी येथील कोरडे दाम्पत्याने आमरण उपोषण सुरू केले आहे.

कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग संभाजीनगर यांना दिलेल्या निवेदनात उपोषणार्थी रामदास कोरडे यांनी म्हटले आहे की जायकवाडी प्रकल्प अंतर्गत भूसंपादन प्रकरण क्र. LAOSR NO ०२/८५ भूसंदर्भ क- ०४/२०११ ते ०८/२०११ LOR प्रकरण मौजे खेडले काजळी ता. नेवासा जि- अहमदनगर कोर्टाच्या वाढीव पेमेंटच्या निकालाचा आदेश होऊन १३ वर्षे झाली तरी व्याजासह पैसे न दिल्या बददल आपण कोर्टाचा आवमान केला आहे. म्हणून आम्ही आपल्या कार्यालयासमोर दि. २७/०३/२०२४ पासून उपोषनासाठी बसलो आहोत.

निवेदनात पुढे म्हटले आहे की संबंधीत जमीनीचे आमचे पेमेंट होत नाही तोपर्यंत दरमहा लाखो रु. पगार घेणाऱ्या संबंधीत आधिकाऱ्यांचे पगाराचे पेमेंट बंद करण्यात यावे. अधिकाऱ्याने कोर्टाच्या आदेशाचे पालन केले नाही. गेल्या १३ वर्षापासून आम्ही संबंधीत कार्यालयाला, अधिकाऱ्यांना, अर्ज देऊन समक्ष भेटी घेतल्या. परंतु ते एकमेकांच्या कार्यालयाचे नाव दाखवतात व




धरणग्रस्त जेष्ठ नागरिकांचा छळ करीत आहे. आमचे उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या जमिनी प्रकल्पात्त गेल्यामुळे आमचे आतोनात हाल होत आहेत. संबंधीत कर्यालयातून पैसे दिल्याशिवाय काम होणार नाही असे आप-सात म्हणतात व टाळाटाळीची उत्तरे देतात. जोपर्यंत आमचे १५% प्याजासह आणि ३०% टक्के रक्कम सह पेमेंट होईपर्यंत या प्रकरणाशी संबंधीत आधिकाऱ्याच्या पगाराचे पेमेंट बंद करण्यात यावे अशी मागणी केली आहे.

उपोषण आंदोलनमुळे आमचे काही बरे-वाईट झाल्यास सर्व संबंधीत अधिकारी त्यास जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी, यापुर्वी आम्ही संबंधीत खात्याला शेकडो पत्र दिलेले आहे. व त्या संदर्भात १ महिन्यात पेमेंट आम्ही करतो असे उत्तरही आलेले आहे. तरी अदयापपर्यंत कार्यवाही केलेली नाही व पेमेंटही केलेले नाही. त्यामुळे आमची उपासमार होत आहे म्हणून कुटूंबासह उपोषण करत असल्याचे रामदास कोरडे यांनी म्हटले आहे

# माझी उमेदवारी निश्चित : खा. लोखंडे

## मला मुख्यमंत्री शिंदे याचा कामाला लागा असा आदेश

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** मला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कामाला लागा असा आदेश दिला असून माझी उमेदवारी निश्चित आहे नामदार राधाकृष्ण विखे सोबत चर्चा झाली माझी स्टिंग ऑपरेशन झाले त्यात मी दहा कोटी नाकारले मात्र त्यांनी तूप खरेदी दहा लाख रुपये खाल्ले त्यांची प्रशासकीय सेवा ३३ वर्षाची झाली असून मी ४० वर्ष जनतेत लोकसेवा केलेली आहे त्यामुळे माझी सेवा मोठी आहे केवळ सभागृह बांधून विकास होत नाही असा आरोप माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्यावर करत आपली उमेदवारी निश्चित आहे असे पत्रकार परिषदेत खासदार सदाशिव लोखंडे यांनी शिर्डी येथे सांगितली खा लोखंडे यांनी पत्रकार परिषदेत आपली उमेदवारी जाहीर केली प्रसंगी शिर्डी नगर परिषदेची माजी नगराध्यक्ष कैलास कोते शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कमलाकर कोते श्रीराज डेरेसंग्राम कोते निलेश कोते रमेश गोंदकर डॉक्टर मच्छिंद्र बोर्डे कपिल पवार संदीप सोनवणे नितीन औताडे धनंजय जाधव दीपक रोहम आदीसह बहुसंख्य पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते मी निवडे धरणासाठी पाठपुरावा करून १२२ गावाच्या शेती व पिण्याचा प्रश्न मार्गी लावला केवळ सभागृह उभे केले म्हणजे विकास होत नाही शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करून निवडणे धरणाचा प्रश्न मार्गी लावला आहे योगभवनासाठी सहा नगरपालिकेंना 80 लाख रुपयाचा निधी दिला असून सहा नगरपालिका हद्दीत योग भवन बांधली असून दोन ठिकाणी जागेची अडचण आली आहे लाख येथील गोदावरी नदीच्या पुलाचा प्रश्न देखील मार्गी लावला असून मला माणसं ओळखण्याची कला आहे त्यामुळे मी विकास कामे करू शकलो असे सांगत जनतेने मला तेरा दिवसात खासदारकीची संधी दिली असून त्यामुळे मी जास्तीत जास्त विकासाची कामे करण्याचा प्रयत्न केला असून मी केलेल्या कामाचे मार्केटिंग न करता विकासाची काम करत आलो आहे.

# तांडा वस्तीची कामे तांडा वस्तीत करा : ग्रामपंचायत सदस्य

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यातील सुलतानपुर येथे शासनस्तरावरून तांडा वस्तीच्या कामांसाठी लाखो रुपयांचा निधी येतो मात्र हि कामे ज्या वार्डात तांडा वस्ती आहे त्या वस्तीत कामे न करता इतर ठिकाणी कामे ठेकेदाराकडून होत आहे त्यामुळे झालेल्या बोगस कामांची चोकशी करून कारवाई करावी अशी मागणी ग्रा.प. सदस्य शिवशंकर निलक यांनी गटविकास अधिकांर्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले की. सुलतानपुर येथे १० लक्ष रुपयांचे हायमसट सोलरचे लाईट ३ नग लावण्यात आले. मात्र सरपंच व ग्रामविकास यांनी मनमानी कारभार करित ज्या ठिकाणी तांडा वस्ती आहे त्या ठिकाणी लाईट न लावता एक लाईट इतर ठिकाणी लावला ज्या लावलेला लाईट कोणत्या आधारे लावला त्यांची चोकशी करावी अशी मागणी ग्रा.प. सदस्य निलक यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे त्यांनी निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बुलडाणा यांनी पाठविल्या आहे याबाबत ग्रा.प. सदस्य शिवशंकर निलक यांनी तांडा वस्तीची कामे तांडा वस्तीत करा अशी मागणी सरपंच व ग्रामविकास यांच्या कडे केली असतांना देखील हा प्रकार घडणे म्हणजेच मनमानी कारभार करणे हा होय? यामुळे याप्रकाराची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी होत आहे.



# नाथ षष्ठीनिमित्ताने पैठणमध्ये पोलिसांचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तीन दिवसावर येवुन ठेपलेल्या संत एकनाथ महाराज षष्ठी यात्रा महोत्सवासाठी लागणार्या पोलीस बंदोबस्ताचा तसेच नाथ मंदिर परिसरात अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार यांनी आढावा घेतला.

बाहेरील नाथ समाधी मंदीर, गावातील नाथमंदिर वाडा,संपुर्ण यात्रा मैदानाची पाहणी करण्यात आली. ३१ मार्च पासून सुरू होणार्या संत एकनाथ षष्ठी महोत्सवाला राज्य भरातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या सुरक्षितेसाठी पोलीस बंदोबस्त तसेच भाविकांची गैरसोय कशी टाळण्यात येईल या विषय चर्चा करण्यात आली. पोलिसांच्या वतीने आज दोन्ही नाथ मंदीर तसेच यात्रा मैदान भागात पोलीस बंदोबस्त, पोलीस मदत कक्ष सीसीटीव्ही कक्ष, सीसीटीव्ही मनोरे, पोलीस चेक पॉईंट, महिला मदत कक्ष तसेच शहरात येणाऱ्या सर्व प्रमुख



रस्त्यावर चेक पॉईंट आदी ठिकाणच्या जागेची पाहणी करण्यात आली.यंदाच्या नाथषष्ठीला राज्यभरातून सुमारे दहालक्ष भविकभक्त येण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे पैठण संजय देशमुख व गोपनीय अंमलदार मनोज वैद्य भाविकांचे सोय गैरसोय बाबत पाहणी करण्यात आली.



# शेतकन्यांमध्ये कृषी विषयक जनजागृती करणाऱ्या कृषी कन्यांना करजगाव येथे निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** ग्रामीण कृषी जागरुकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय सोनईच्या कृषिकन्यांनी १० आठवडे विविध विषयांवर कार्यक्रम राबवले. या कृषिकन्यांना २३ मार्च रोजी करजगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी शिक्षक वर्गासह विद्यार्थी उपस्थित होते. या विद्यार्थिनींचा मुख्याध्यापकांच्या हस्ते गुलाबपुष्प व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी कृषी कन्या साबळे निकिता, मडके विशाखा, पटेकर सोनाली, पवार प्रसन्ना, ठाणगे प्रतिक्षा यांच्या समवेत शिक्षक वाघाडे सर, खेमनार मॅडम आदि शिक्षक,पालक व गावकरी उपस्थित होते.या कृषीकन्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ.एच.जी. मोरे, उपप्राचार्य प्रा. एस. व्ही. बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. ए.ए. दरंदले, कार्यक्रम अधिकारी डॉ.पी.आर. गिरी यांचे कृषिकन्यांना मार्गदर्शन लाभत आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# जगदगुरू संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याची पुष्पवृष्टी करून सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** येथील संत तुकाराम महाराज मंदिरा मध्ये तुकाराम बिजेनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळ्याची हभप उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते काल्याचे किर्तनाने दहीहंडी फोडून उत्साहात सांगता करण्यात आली.जगदगुरू संत तुकाराम महाराज यांनी संतांच्या परमार्थाला उंचीवर नेण्याचे काम केले म्हणून ते कलशाच्या स्थानी असून वारकरी संप्रदायातील परमार्थ त्यांच्या भक्तीने फुलला असल्याचे प्रतिपादन हभप उद्धव महाराज मंडलिक यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी बोलतांना हभप उद्धवजी महाराज मंडलिक म्हणाले की प्रपंचातील सुख हे आटणार आणि विटणार असे आहे,पारमार्थिक सेवेतून खरे समाधान असून ते संसारात मिळत नाही,परमार्थाच्या सेवेतून परमात्म्याच्या प्राप्ती होत असते,अध्यात्म हे संकट ओळखण्याचे दृष्टी देते,चांगले सुविचार जीवनात प्राप्त होण्यासाठी भावी पिढीला अध्यात्मिक शिक्षण देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.संत वाड्मय हे गोड असे असून भक्त ही तल्लीन होतो,वाणीमध्ये चांगल्या गोष्टी येण्यासाठी हरिनामाचा छंद अंगीकारा असे आवाहन करून त्यांनी तुकाराम बिजेनिमित्त संत तुकाराम महाराज यांच्या वैकुंठगमन सोहळ्याचे वर्णन केले.

झालेल्या काल्याच्या कीर्तनात भगवान परमात्म्याच्या बाललीलांचे वर्णन काल्याच्या कीर्तनात बोलताना त्यांनी केले. संतांनी दिलेला परमार्थ संत तुकाराम महाराजांनी भक्तीच्या माध्यमातून उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला म्हणूनच ते वारकरी संप्रदायातील कलशाच्या स्थानी जाऊन पोहचले,संत तुकाराम महाराजांच्या वैकुंठगमनाने अलौकिक चरित्र घडले असे त्यांनी सांगितले.यावेळी संत सेवेकरी रखमाजी नाचन व कृष्णा शिंदे यांच्या वतीने संतपूजन करण्यात आले.

यावेळी गाथा पारायण सोहळ्याच्या प्रसंगी योगदान देणाऱ्यांचा गौरव ह.भ.प. उद्धव महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.उपस्थित भाविकांना विखोना व ताराबाई भाऊसाहेब पाटील व संजय पाटील परिवाराच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी झालेल्या बीज सोहळा सांगता प्रसंगी भागवताचार्य अंकुश महाराज जगताप, नारायण महाराज नजन, लक्ष्मीनारायण जोंधळे, साहेबराव चावरे, महाराज माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, शंकरराव लोखंडे, इंजिनियर सुनीलराव वाघ, डॉ. लक्ष्मणराव खंडाळे, पी. आर. जाधव, विष्णूपंत ठोसर, महेंद्र महाराज शेजुळ, बाबासाहेब महाराज सातपूते, सुनील महाराज पारे, सेवेकरी गणेश डोंगरे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहाय्यक बीडिओपदी रामेश्वर शंकर बेडके

आधुनिक केसरी न्यूज



**शेवगाव :** नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग च्या परीक्षाचा निकाल लागला व या निकालात मठाचीवाडी या छोट्याशा गावातील व मध्यमवर्गीय कुटुंबातील रामेश्वर शंकर बेडके यांची सहाय्यक बी डि ओ पदी निवड झाली व या परीक्षेमध्ये पहिल्याच प्रयत्नामध्ये त्यांची 148 रँक मिळाली अतिशय मध्यमवर्गीय कुटुंबातील खडतर अशा परिस्थितीमधून यश संपादन केले त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या गावी मठाचीवाडी या ठिकाणी झाले व पाचवी ते बारावी नवजीवन महाविद्यालय दहिगाव या ठिकाणी झाले व पुढे संगमनेर या ठिकाणी श्रमशक्ती कृषी महाविद्यालय मालदांड या ठिकाणी शेतीशी नाळ असल्यामुळे बीएससी ॲग्री शेतीचे शिक्षण पूर्ण करून पुढे एमपीएससीची तयारी स्वयमध्यानातून करून त्यांचेच थोरले बंधू गोविंद शिवाजी बेडके यांची देखील सहा महिन्यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहा. पोलीस निरीक्षक या पदी निवड झाली आहे. खरंच ग्रामीण भागातून व मध्यमवर्गीय कुटुंबातून खडतराशा प्रवासातून या दोन्ही बंधूंनी एकाने पोलीस निरीक्षक व दुसऱ्याने सहाय्यक बी डि ओ पदी निवड झाली आहे या दोन्ही भावांचे सर्व सरातून मोठ्या प्रमाणात कौतुक करण्यात येत आहे.

# श्रीपद्म शिंदे शिष्यवृत्ती परीक्षेत केंद्रात प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** तालुक्यातील लाडजळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी नुकत्याच झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये जिल्हा गुणवत्ता यादीत झळकले असून शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद अहमदनगर आयोजित "मिशन आरंभ २०२४" उपक्रमांतर्गत दि. १० मार्च रोजी आयोजित केलेल्या इयत्ता-चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल दि. २० मार्च रोजी जाहीर करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी विद्यार्थी गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी म्हणून स्पर्धात्मक स्वरूपाच्या अभ्यासाची तयारी ग्रामीण भागातील मुलांनी प्राथमिक स्तरापासूनच सुरू करावी या हेतूने हा उपक्रम सुरू केला. यामध्ये शेवगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लाडजळगाव येथील श्रीपद्म प्रविण शिंदे ( इयत्ता चौथी ) याने या परीक्षेत ३०० पैकी २५२ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये स्थान पटकावून त्याने तालुकास्तरावर आठवा तर बालमटाकळी केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. त्याचबरोबर अमृता पांडुरंग पाटील, श्रावणी जगदीश तहकीक, साईराज प्रभाकर तहकीक, स्वरा वैजिनाथ नागरे, शिवराज बाळासाहेब तहकीक, शिवानी राजेंद्र जाधव अशी एकूण सात विद्यार्थी संबंधित परीक्षेत पात्र ठरले आहेत. मुलांच्या गुणवत्ता विकासात शाळेचे आदर्श वर्ग शिक्षक प्रविण शंकर शिंदे त्याचप्रमाणे सहकारी आदर्श शिक्षिका श्रीमती राजगुरू भारती भाऊसाहेब, श्रीमती तनपुरे संतोषी शामराव व श्रीमती गर्जे मंगल देवराव यांचे मोलाचे असे मार्गदर्शन व योगदान लाभले. शालेय भौतिक विकास त्याचबरोबर विद्यार्थी गुणवत्ता विकास कामी शेवगावचे गटशिक्षणाधिकारी श्रीमती तृप्ती कोलते, विस्तार अधिकारी डॉ. शंकर आसाराम गाडेकर, केंद्रप्रमुख काळु भांगरे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.



# 12 प्रकारचे ओळख पुरावे मतदानासाठी ग्राह्य

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीकरीता मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार फोटो ओळख पत्राव्यतिरिक्त इतर 12 प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले आहेत. यापैकी कोणताही एक ओळख पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणुक 2024 करिता ज्या मतदारांना छायाचित्रासह मतदार ओळखपत्र (ई-पिक) देण्यात आलेले आहे ते मतदार, मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकत नाही, अशा मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त पुढीलप्रमाणे कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहेत.
आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक किंवा पोस्ट ऑफिसने जारी केलेले छायाचित्र असलेले पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांचेद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र/राज्य सरकार/ सार्वजनिक उपक्रम/ पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जरी केलेले सेवा ओळखपत्र, खासदार/आमदारांना जरी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र असे एकुण 12 कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहेत.
छायाचित्रासह मतदार ओळखपत्रान्वये मतदाराची ओळख पटत असेल तर मतदार ओळखपत्रातील किरकोळ विसंगती दुर्लक्षित करण्यात येणार आहे. छायाचित्रासह मतदार ओळखपत्रावरील विसंगत छायाचित्रामुळे मतदाराची ओळख पटणे किंवा पटविणे शक्य नसल्यास मतदारास उपरोक्त पर्यायी कागदपत्रापैकी एक ओळख कागदपत्र सादर करणे आवश्यक राहणार आहे. तर प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी केवळ त्यांचा मुळ पासपोर्ट आवश्यक राहणार आहे. मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राचा, मतदार यादीतील अनुक्रमांक, मतदानाची तारीख, वेळ इत्यादी माहिती उपलब्ध होण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने 'फोटो व्होटर स्लीप' ऐवजी 'मतदार माहिती चिठ्ठी' मतदानाच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस अगोदर वितरीत करण्याच्या सुचना दिल्या आहेत. मात्र मतदारांच्या ओळखीचा पुरावा म्हणून मतदार माहिती चिठ्ठी ग्राह्य असणार नाही. चंद्रपूर जिल्हा व चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीकरिता नियुक्त सर्व संबंधित अधिकारी व सर्व मतदान केंद्राध्यक्षांनी याची नोंद घ्यावी, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी कळविले आहे.

# शेतकऱ्यांना गाव नकाशाबाबत मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील लांडेवाडी येथे बेल्हेकर शिक्षण संस्थेतील कृषीदुताकडून ग्रामीण कृषी जागरुकता आणि औद्योगिक कार्यानुभव अभियानांतर्गत गावच्या नकाशाबाबत माहिती देण्यात आली. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित सुलोचना बेल्हेकर सामाजिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था अंतर्गत कृषी महाविद्यालय भानसहिवरे येथील कृषीदूत खळेकर शिवराज, कोतकर हर्षल, शेडगे शुभम, निरपळ विराज यांनी ग्रामपंचायतीत गावचा नकाशा तयार करून माहिती दिली.

याप्रसंगी उपसरपंच सोमनाथ लांडे, संजय दरंदले, अमोल घावटे व गावातील इतर गावकरी उपस्थित होते.
या कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. ए. तूरभटमट सर तसेच कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक एम. आर. माने व कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक महाजन, प्राध्यापिका खकाळे ,प्राध्यापक सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर